जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 DEC 2019
Times of India

# SUK declares results for 182 examinations

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK), till Decmeber 30, has announced as many as 182 results of winter semester examinations.

An official from the exam department said the results of the conventional courses like BA, BCom, and BSc have been announced, and other results will be announced soon.

GR Palase, in-charge director of SUK's board of examinations and evaluation, told **TOI** that out of the total 182 results 177 of them have been complied with the deadline of 45 days. "Only five results got delayed due to unavailability of the faculty members," he said.

"More teachers should come forward for the assessment duties. I would like to urge college principals to request their faculty members to join the Centralized Assessment Program (CAP) to speed up the assessment process. It has been observed that senior faculty members refrain from assessment duties which indirectly puts the junior faculty members under stress," he said.

According to Palase, 591 examinations were conducted by the university and the remaining results are likely to be declared in the coming days. TNN

31 DEC 2019

तरुण भारत

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



'तरुण भारत'चे समूह प्रमुख सल्लागार संपादक किरण ठाकुर यांना शुभेच्छा देताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, पुढारीचे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव, सकाळचे संपादक संचालक श्रीराम पवार, लोकमतचे सरव्यवस्थापक मकरंद देशमुख, महाराष्ट्र टाईम्सचे निवासी संपादक विजय जाधव, बी न्यूजचे संपादक चारूदत्त जोशी.

'लोकमत महामॅरेथॉन'च्या माध्यमातून आरोग्याबाबतची एक चांगली चळवळ कोल्हापूरमध्ये सुरु झाली आहे. या महामॅरेथॉनद्वारे सदृढ आरोग्य आणि पर्यावरणरक्षण, संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश दिला जातो. महामॅरेथॉनच्या या आरोग्यदायी उपक्रमामध्ये कोल्हापूरसह परिसरातील सर्व धावपटू, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. शिवाजी विद्यापीठदेखील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या आरोग्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविते. त्याद्वारे त्यांच्यामध्ये सदृढ आरोग्याबाबतचे संस्कार रुजविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामध्ये गेली साडेचार वर्षांपासून रोज योगाचे वर्ग विद्यापीठात घेण्यात येत आहेत. वर्षातून दोनवेळा शिबिरांच्या माध्यमातून आरोग्य तपासणी केली जाते.



-डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ

# उच्च शिक्षणाची गंगा आप्पासाहेबांनी आणली

## प्रा. किसनराव कुराडे; डॉ. 'पवार कमवा व शिका' प्रबोधिनीतर्फे स्मृतिदिन

**कोल्हापूर, ता. ३० :** 'शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यामुळेच तळागाळातील, बहुजन समाजातील मुलांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणले. आप्पासाहेबांनी बजावलेल्या पितामह स्वरूपाच्या कामगिरीमुळेच शिवाजी विद्यापीठ आज लौकिक पावले. त्यांनी कोल्हापुरात उच्च शिक्षणाची गंगा प्रवाहित केली,' असे गौरवोद्गार प्रा. किसन कुराडे यांनी आज काढले. डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन योजना आणि डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पवार यांचा स्मृतिदिन व विद्यार्थी भवनच्या सुवर्णमहोत्सवाचा उद्घाटन समारंभ कार्यक्रमाचे आयोजन



**प्रा.किसन कुराडे.**

केले होते. या कार्यक्रमात कुराडे बोलत होते. कार्यक्रमाला कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

प्रा. कुराडे म्हणाले, ''यशवंतराव चव्हाण आणि बाळासाहेब देसाई हे आप्पासाहेबांचे विद्यार्थी. त्यांनी केवळ शिकवण्याचे काम केले नाही, तर विद्यार्थी घडवण्याचे कार्य केले. कमवा आणि शिकवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास तर केलाच, पण त्यांच्यावर जो श्रमसंस्कार केला, तो त्यांच्या आयुष्यभर लक्षात राहिला.''

### आप्पासाहेब पुतळा लवकरच

याप्रसंगी डॉ. नांदवडेकर म्हणाले, ''विद्यापीठाच्या आवारात डॉ. आप्पासाहेब पवार यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येणार आहे. लवकरच या कामाला गती येईल, पुढील चार महिन्यांत हे काम पूर्ण होईल.''

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ''विद्यार्थी भवनच्या विद्यार्थ्यांनी आपल्या पूर्वसुरींच्या अनुभवातून कृतिशील होण्याचा आदर्श घ्यावा. 'कमवा व शिका' योजनेची सुरवात त्यांनी केली. त्यामागे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देण्याचा हेतू होताच, पण त्या बरोबरीने कौशल्य विकास, आत्मनिर्भरता आणि आत्मविश्वासाची पेरणीही त्यांनी केली.''

प्राचार्य डॉ. एस.जे. नाईक यांनी स्वागत केले. प्राचार्य जी. पी. माळी यांनी परिचय करून दिला. योगेश घाडेकर व सुप्रिया सोहोनी यांनी सूत्रसंचालन केले. प्रबोधिनीचे सचिव प्रा. टी. के. सरगर यांनी आभार मानले.

व्ही. टी. पाटील, गजानन पळसे, प्राचार्य मानसिंग जगताप, प्रा. अशोक जगताप, डॉ. ए. एम. गुरव यांच्यासह अनेक शिक्षक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यामुळे तळागाळातील विद्यार्थी उच्चशिक्षण प्रवाहात : प्रा. कुराडे

## शिवाजी विद्यापीठाच्या कमवा व शिका योजनेचा सुवर्ण महोत्सव



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवा यांच्या स्मृतिदिनानिमित्त पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळ कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी (छाया : तय्यब अली)

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यामुळेच तळागाळातील, बहुजन समाजातील मुलांना उच्चशिक्षणाच्या प्रवाहात स्थान लाभले, असे गौरवोद्गार ज्येष्ठ साहित्यिक प्रा. किसनराव कुराडे यांनी काढले.

डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन योजना व डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पवार यांचा ३८ वा स्मृतिदिन व विद्यार्थी भवनच्या सुवर्ण महोत्सवाचा उद्घाटन समारंभ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

विद्यार्थी भवनच्या पहिल्या बॅचचे विद्यार्थी असलेल्या प्रा. कुराडे यांनी डॉ. पवार यांच्या अनेक आठवणी सांगितल्या. ते म्हणाले, यशवंतराव चव्हाण व बाळासाहेब देसाई हे आप्पासाहेबांचे विद्यार्थी. कोल्हापुरात उच्चशिक्षणाची गंगा प्रवाहित करण्यासाठी त्यांनी या विद्यार्थ्यांचे सहाय्य तर घेतले. शिवाय, वैयक्तिक योगदान देऊन या परिसराच्या भौतिक आणि शैक्षणिक विकास व विस्ताराची पायाभरणी केली. शालाबाह्य कंजारभाट समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, आप्पासाहेब हे विद्यापीठासाठी दीपस्तंभ होतेच; पण त्यांनी या समाजाला अनेक दीपस्तंभ निर्माण करून दिले. कमवा व शिका योजनेतील मुलींसाठी भवनच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त वसतिगृह उभारण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्याची ग्वाही त्यांनी दिली. भवनच्या माजी विद्यार्थ्यांनी कृतज्ञता निधी उभारून त्या माध्यमातून येथे विविध उपक्रम राबवावेत. भवनमध्ये शिकून बाहेर पडलेल्या ५० निवडक व्यक्तींच्या चरित्रांचा समावेश असणारे पुस्तक तयार करावे, अशी सूचनाही केली. अध्यक्षीय भाषणात कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे काम चार महिन्यांत पूर्ण करण्याची ग्वाही दिली.

भवनचे अधीक्षक डॉ. संभाजी शिंदे, डॉ. सी. टी. पवार, प्रा. जी. एस. हिरेमठ, प्रा. सुदाम पाटील, निवृत्त वेल्फेअर आयुक्त अंकुश मोरे, प्रा. शितोळे आदींनी मनोगते व्यक्त केली. प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. जे. नाईक यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य जी. पी. माळी यांनी परिचय करून दिला. योगेश घाडेकर व सुप्रिया सोहोनी यांनी सूत्रसंचालन केले. प्रबोधिनीचे सचिव प्रा. टी. के. सरगर यांनी आभार मानले.

लोकमत

# आप्पासाहेबांमुळेच विद्यापीठाचा लौकिक

## किसन कुराडे; शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी भवनच्या सुवर्णमहोत्सवास प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** यशवंतराव चव्हाण आणि बाळासाहेब देसाई हे आप्पासाहेबांचे विद्यार्थी. कोल्हापुरात उच्चशिक्षणाची गंगा प्रवाहित करण्यासाठी त्यांनी आपल्या या विद्यार्थ्यांचे साहाय्य तर घेतलेच; शिवाय, ज्या पद्धतीने अथक वैयक्तिक योगदान देऊन या परिसराच्या भौतिक आणि शैक्षणिक विकास व विस्ताराची पायाभरणी केली, त्याला तोड नाही. आप्पासाहेबांनी बजावलेल्या पितामह स्वरूपाच्या कामगिरीमुळेच शिवाजी विद्यापीठ हे लौकिक पावले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. किसनराव कुराडे यांनी सोमवारी केले.



शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त सोमवारी त्यांच्या पुतळ्यास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आदींनी अभिवादन केले.

### सकारात्मक विचार

प्रा. कुराडे यांनी डॉ. पवार यांच्या अनेक आठवणी सांगितल्या. कंजारभाट समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आप्पासाहेबांनी केलेल्या धडपडीमुळे सकारात्मक विचार करण्याची शिकवण आमच्यात रुजली, असे प्रा. कुराडे यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन योजना आणि कमवा व शिका प्रबोधिनीतर्फे आयोजित डॉ. पवार यांचा ३८ वा स्मृतिदिन व विद्यार्थी भवनच्या सुवर्णमहोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, तर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे प्रमुख उपस्थित होते. डॉ. शिंदे म्हणाले, कमवा व शिका योजनेतील मुलींसाठी भवनच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त वसतिगृह उभारण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येईल. भवनमध्ये शिकून बाहेर पडलेल्या ५० निवडक व्यक्तींच्या चरित्रांचा समावेश असणारे पुस्तक तयार करावे. भवनचे अधीक्षक डॉ. संभाजी शिंदे, सी. टी. पवार, जी. एस. हिरेमठ, सुदाम पाटील, निवृत्त वेल्फेअर आयुक्त अंकुश मोरे, प्रा. शितोळे, आदींनी मनोगते व्यक्त केली. प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. जे. नाईक यांनी स्वागत केले. प्राचार्य जी. पी. माळी यांनी परिचय करून दिला. योगेश घाडेकर, सुप्रिया सोहोनी यांनी सूत्रसंचालन केले. प्रबोधिनीचे सचिव प्रा. टी. के. सरग यांनी आभार मानले. दरम्यान, कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते विद्यार्थी भवन परिसरात वृक्षारोपण व सुवर्णमहोत्सवी फलकाचे अनावरण केले. यावेळी व्ही. टी. पाटील, गजानन पळसे, मानसिंग जगताप, अशोक जगताप, ए. एम. गुरव उपस्थित होते.

# अप्पासाहेब पवार शिक्षणक्षेत्रातील पितामह

## विद्यार्थी भवन सुवर्णमहोत्सवास प्रारंभ

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यामुळेच तळागाळातील, बहुजन समाजातील मुलांना उच्चशिक्षणाच्या प्रवाहात स्थान लाभले. त्यांनी बजावलेल्या पितामह स्वरुपाच्या कामगिरीमुळेच शिवाजी विद्यापीठाचा लौकिक वाढला,असे प्रतिपादन साहित्यिक प्रा. किसनराव कुराडे यांनी केले. 'विद्यापीठ परिसरात त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणीचे काम सहा महिन्यात पूर्ण करावे,'अशी मागणी त्यांनी केली.

शिवाजी विद्यापीठातील 'डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन कमवा व शिका योजना आणि डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनी' यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पवार यांचा ३८ वा स्मृतिदिन व विद्यार्थी भवनच्या सुवर्ममहोत्सवाचा उद्‌घाटन समारंभ सोमवारी झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. कुराडे बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला.

प्रा. कुराडे म्हणाले, 'यशवंतराव चव्हाण आणि बाळासाहेब देसाई हे अप्पासाहेबांचे विद्यार्थी. कोल्हापुरात उच्चशिक्षणाची गंगा प्रवाहित करण्यासाठी त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांचे सहाय्य घेतले. शिवाय अतिशय निष्ठेपूर्वक विद्यापीठ उभारणीसाठी योगदान दिले.'



शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पुतळ्यास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पुष्पहार अर्पण केले. याप्रसंगी डॉ. सी. टी. पवार, डॉ. एस. जे. नाईक, प्रा. टी. के. सरगर आदी.,

कुलगुरू शिंदे म्हणाले म्हणाले, 'अप्पासाहेब पवार हे विद्यापीठासाठी दीपस्तंभ आहेत. भवनच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त कमवा व शिका योजनेतील मुलींसाठी वसतिगृह उभारण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात तरतूद करू. तसेच भवनच्या माजी विद्यार्थ्यांनी कृतज्ञता निधी उभारुन विविध उपक्रम राबवावेत.'

प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. सी. टी. पवार, प्रा. जी.एस. हिरेमठ, प्रा. सुदाम पाटील, निवृत्त विभागीय आयुक्त अंकुश मोरे, भवनचे अधीक्षक डॉ. संभाजी शिंदे आदींनी मनोगते व्यक्त केली. प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. जे. नाईक यांनी स्वागत केले. प्राचार्य जी. पी. माळी यांनी परिचय करून दिला. योगेश घाडेकर व सुप्रिया सोहोनी यांनी सूत्रसंचालन केले. प्रबोधिनीचे सचिव प्रा. टी. के. सरगर यांनी आभार मानले.

तत्पूर्वी विद्यार्थी भवन परिसरात वृक्षारोपण व सुवर्णमहोत्सवी फलकाचे अनावरण झाले. आप्पासाहेब पवारांच्या पुतळ्यास अभिवादन केले. यावेळी विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, प्राचार्य मानसिंग जगताप, प्रा. अशोक जगताप, अधिष्ठाता डॉ. ए.एम. गुरव आदी उपस्थित होते.

### चार महिन्यात पुतळा उभारू

कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले,'डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या चरित्रातून चांगल्या गोष्टींसाठी आग्रही राहण्याचा आदर्श मिळतो. विद्यार्थी भवनने अनेक गुरूवर्य घडविले, म्हणून तळागाळातील विद्यार्थी शिक्षण घेऊ शकले. डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे काम येत्या चार महिन्यांत पूर्ण केले जाईल असे सांगितले.



शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे 'अ क्रॅश कोर्स इन जापनीज लँग्वेज अँड कल्चर' अभ्यासक्रमाच्या उदघाटनप्रसंगी अरूण आराध्ये यांचा सत्कार करताना डॉ. डी. टी. शिर्के. सोबत मेघा पानसरे, स्नेहल शेट्ये.

# विद्यापीठात जापनीज लँग्वेज कोर्स सुरू

कोल्हापूर टाइम्स टीम

'विदेशी भाषा विभाग हा कोल्हापुरातील औद्योगिक क्षेत्र व विद्यापीठ यामधील सांस्कृतिक दुवा ठरू शकतो. शैक्षणिक व औद्योगिक संस्थांत ज्ञान, संशोधन व सेवा यांची देवाणघेवाण ही दोन्ही क्षेत्रांना समृद्ध करणारी अत्यंत महत्वाची बाब आहे,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे 'अ क्रॅश कोर्स इन जापनीज लँग्वेज अँड कल्चर' हा नवा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. त्याच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी मेनन बेअरिंग्ज लि.चे संचालक अरुण आराध्ये प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अरुण आराध्ये म्हणाले, 'जपान व इतर देशांशी मेनन बेअरिंग्ज लि.चे व्यापारी संबंध निर्माण झाल्यानंतर संस्थेचे अधिकारी व इंजिनियर कंपनीच्या कामानिमित्त परदेशी जातात. तेव्हा तेथील वास्तव्यात स्थानिक लोकांशी संवाद साधण्यात भाषेचा अडसर येतो. तसेच तेथील सांस्कृतिक जीवनाचा परिचय असणे अत्यावश्यक ठरते. कंपनीची ही गरज लक्षात घेऊन विदेशी भाषा विभागाने जपानी भाषा व संस्कृती अभ्यासक्रम तयार केला, ही अतिशय समाधानकारक बाब आहे. त्याचा कंपनीच्या स्टाफसाठी नक्कीच फायदा होईल.' विभागप्रमुख मेघा पानसरे म्हणाल्या, 'या नव्या अभ्यासक्रमात जपानी लिपी व दैनंदिन वापरातील अभिव्यक्ती, इतिहास- भूगोल व सांस्कृतिक जीवन, तसेच औद्योगिक परिभाषा यांचा परिचय करून दिला जाणार आहे.' याप्रसंगी मेनन बेअरिंग्ज लि. चे प्रशासकीय अधिकारी पवन देसाई, जपानी भाषेचे विद्यार्थी उपस्थित होते. स्नेहल शेट्ये यांनी आभार मानले.